**पदवीधर व अन्य कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**पाटबंधारे विभाग,**
**निर्णय क्रमांक सीडीएस १५८२/१५८(२१५) आ (१०)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**दिनांक १६ एप्रिल, १९८४.**

दिनांक १० मार्च, १९८१ रोजी महाराष्ट्र विधानमंडळासमोर शासनातर्फे असे निवेदन करण्यात आले की, शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या पदवीधर कनिष्ठ अभियंत्यांना, तसेच यापुढे शासनाच्या सेवेत कनिष्ठ अभियंत्यांच्या पदावर भरती होणाऱ्या पदविधरांना राजपत्रित अधिका-यांचा दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानंतर लगेच म्हणजे दिनांक १९ मार्च, १९८१ रोजी महाराष्ट्र विधानमंडळासमोर, निर्धारित सेवाकाळ सर्ती पूर्ण करणा-या पदविकाधारक व अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांनासुध्दा राजपत्रित दर्जा देण्याबाबत शासनातर्फे निवेदन करण्यात आले. या दोन्ही निवेदनांच्या अनुषंगाने, पदविधर व अपदविधर कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित वर्ग २ चा दर्जा देताना कोणती नवीन वेतनश्रेणी असावी. त्याचप्रमाणे त्यांचे पदनाम काय असावे इत्यादिबाबतचे प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होते.

<u>निर्णय</u> :- शासन आता असे आदेश देत आहे की,

(१) दिनांक १ एप्रिल, १९८१ पासून पाटबंधारे खाते व सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन्ही खात्यांच्या अंतर्गत स्थापत्य, यांत्रिकी, विदयुत, विदयुत व यांत्रिकी तसेच शेतकी अभियांत्रिकी क्षेत्रातील व पदांवर कार्यरत असलेल्या पदविधर कनिष्ठ अभियत्याना, तसेच भविष्यकाळात ह्या नेमणुकीसाठी सेवेत भरती होणा-या पदविधर अभियंत्यांना, आणि खाली दर्शविलेला सेवाकाळ पूर्ण केलेल्या पदविकाधारक व अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांना "राजपत्रित अधिकारी, वर्ग -२ (कनिष्ठस्तर)" असा दर्जा देण्यात यावा.

| पदविकाधारक व अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांची वर्गवारी<br>१ | राजपत्रित दर्जा मिळण्यास लागणारा आवश्यक सेवाकाळ<br>२ |
|---|---|
| (अ) ३ वर्षाची पदविका धारण केलेले कनिष्ठ अभियंते | ५ वर्षे |
| (ब) २ वर्षाची किंवा तत्सम पदविका धारण केलेले कनिष्ठ अभियंते | ७ वर्षे |
| (क) अर्हतारहित कनिष्ठ अभियंते | १० वर्षे |

(२) राजपत्रित दर्जा, वर्ग -२ (कनिष्ठस्तर) प्राप्त होणा-या (स्थापत्य) कनिष्ठ अभियंत्यांसाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा वर्ग -२ मध्ये दोन वेगळे संवर्ग निर्माण करण्यात यावेत. व पदविधर अभियंत्यांना "सहायक अभियंता, श्रेणी -२" (असिस्टंट इंजिनिअर, ग्रेड -२) आणि पदविकाधारक व अर्हतारहित अभियंत्यांना "शाखा अभियंता" (सेक्शनल इंजिनिअर्स) असे संबोधण्यात यावे. सहायक अभियंता श्रेणी -२ ची नवीन संवर्ग पदे कनिष्ठ अभियंत्यांच्या एकूण पद सख्येच्या २५ टक्के राहतील.

त्याचप्रमाणे अन्य अभियांत्रिकी सेवा, वर्ग -२ मध्ये, वरीलप्रमाणे सहायक अभियंता, श्रेणी -२ व शाखा अभियंता असे दोन नवीन संवर्ग निर्माण करण्यात यावेत.

(३) सहायक अभियंता, श्रेणी -२ व शाखा अभियंता या दोन्ही संवर्गातील पदांसाठी समान वेतनश्रेणी, रुपये ६००-३०-७५०-४०-९५० अशी मंजूर करण्यात यावी.

(४) सहायक अभियंता, श्रेणी -२ व शाखा अभियंता, असे दोन नवीन कनिष्ठस्तर संवर्ग महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा, वर्ग -२ मध्ये निर्माण करण्यात येत असल्यामुळे, सहायक अभियंता, वर्ग -२ (असिस्टंट इंजिनिअर, क्लास -२) व सहायक अभियंता, वर्ग -१ (असिस्टंट इंजिनिअर, क्लास -१) यांच्या पदनामात खालीलप्रमाणे बदल करण्यात यावा :-

| संदयाचे पदनाम | नवीन पदनाम |
|---|---|
| (१) सहायक अभियंता, वर्ग -२ | सहायक अभियंता, श्रेणी -१ (असिस्टंट इंजिनिअर, ग्रेड -१) |
| (२) सहायक अभियंता, वर्ग -१ | सहायक कार्यकारी अभियंता (असिस्टंट एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर) |

(५) उप विभागीय पदांसाठी विहित केलेल्या रुपये ६००-३०-७५०-द.रो.-४०-११५० या वेतनश्रेणीत लोकसेवा आयोगामार्फत होणा-या स्पर्धात्मक परीक्षा घेऊन महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, वर्ग-२ मध्ये सरळ सेवा प्रविष्ठ झालेले अधिकारी, म्हणजे सहायक अभियंते श्रेणी -१ (वरील नवीन पदनाम) यांना दिनांक १ एप्रिल, १९८१ पासून रुपये ६६०/- चे उच्चस्तर प्रारंभिक वेतन देण्यात यावे.

(६) सहायक अभियंता, श्रेणी -२ आणि शाखा अभियंता यांना उपविभाग तथा इतर कार्यालयात सध्या कनिष्ट अभियंत्यांना ज्या धर्तीवर नियुक्ती करण्यात येते त्या धर्तीवर नियुक्ती /नेमणुक देण्यात यावी. तसेच, कनिष्ठ अभियंत्यांसाठी असलेली कर्तव्ये, कामे आणि अधिकार सहायक अभियंता, श्रेणी -२ आणि शाखा अभियंता यांना देखील तूर्त तरीच लागू राहावेत.

(७) यापुढे भविष्यकाळात सहायक अभियंता, श्रेणी -१ व सहायक कार्यकारी अभियंता या पदांव्यतिरिक्त शासन सेवेत भरती होणा-या अभियांत्रिकी पदविधरांना सहायक अभियंता, श्रेणी -२ म्हणून थेट नियुक्ती देण्यात यावी.

२. सहायक अभियंता, श्रेणी -२ व शाखा अभियंता या नवीन संवर्गासाठी निर्धारित प्रमाणात मंजूर करावयाच्या पदांची संख्या व त्यावरील अभियंत्यांच्या नियुक्तीबाबत त्याप्रमाणे अन्य संबंधित बाबीबद्दलचे यथायोग्य आदेश अलगरित्या काढण्यात येतील, अर्हतेसाठी शर्ती पूर्ण करण्या-या अधिका-यांच्या नवीन संवर्गातील पदांवरील नेमणुकीसंबधिचे नियम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करुन अलगरित्या ठरविण्यांत यावेत.

३. हे आदेश सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभाग यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कनिष्ठ अभियंत्यांच्या बाबतीत आवश्यक ते आदेश काढावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक सांकेतांक क्र. 201501141622478227

प. र. गांधी,
शासनाचे सचिव

प्रती,

- सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
- वित्त विभाग, मंत्रालय (५ प्रती),
- सार्वजनिक बांधकाम विभाग /सेवा -३, मंत्रालय (२५ प्रती)
- नगरविकास विभाग, मंत्रालय,
- कृषि व सहकार विभाग, मंत्रालय,
- ग्रामविकास विभाग, मंत्रालय,
- शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय,
- मंत्रालयातील इतर विभाग,
- महालेखापाल -१, महाराष्ट्र, मुंबई (१० प्रती),
- महालेखापाल -२, महाराष्ट्र, नागपूर (१० प्रती),
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
- लेखा अधिकारी, कोयना,
- निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग , मुंबई (पत्राद्वारे)
- सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग /सार्वजनिक बांधकाम विभाग,
- सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग,
- सर्व प्रशासक, पाटबंधारे विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग,
- सर्व कार्यकारी अभियंते, पाटबंधारे विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग,
- मा. मुख्य मंत्र्याचे स्वीय सहायक,
- मा. मंत्री (पाटबंधारे)/मंत्री (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांचे स्वीय सहायक.
- मा. राज्य मंत्री (पाटबंधारे)/ राज्य मंत्री (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांचे स्वीय सहायक.
- मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
- सचिव (१), पाटबंधारे विभाग, यांचे स्वीय सहायक,
- लाभक्षेत्र विकास आयुक्त व सचिव (पाटबंधारे विभाग) यांचे स्वीय सहायक.
- सचिव (१), सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहायक.
- सचिव (२), सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहायक.
- सर्व मुख्य अभियंते व सह सचिव (पाटबंधारे विभाग)/(सार्वजनिक बांधकाम विभाग) यांचे स्वीय सहायक.
- सर्व तांत्रिक अधिकारी, पाटबंधारे विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग.
- सर्व कार्यासने /शाखा, पाटबंधारे विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग
- वर्ग "अ" माहितीसाठी.